(महाराष्ट्र शासन अंगीकृत).

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.

Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

C.I.N. No. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. औसंवि/ब/१४०७६ दिनांक : ०६.०६.२०२२

# परिपत्रक

**विषय :** MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy २०२२-२३.

******

म.रा.वि.मं.सुत्रधारी कंपनी मर्यादित व महावितरण कंपनीतील कार्यरत कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असलेल्या कुटुंबातील ०५ सदस्यांकरिता MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy दि.१५.०५.२०२२ ते १४.०५.२०२३ या कालावधीसाठी सलगपणे सुरु ठेवण्याकरिता मा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं.सुत्रधारी कं.मर्यादित यांनी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण / महापारेषण व महानिर्मिती तसेच चारही कंपन्यांतील संचालक (वित्त) व तिन्ही कंपन्यांतील संचालक (मासं), याच्यांशी विचारविनिमय करुन मंजूरी दिलेली आहे.

तसेच, MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy २०२२-२३ या कालावधीकरिता M/s Marsh India Insurance Broker Pvt. Ltd या Consultant / Adviser / Broker यांच्यामार्फत सदर योजनेच्या कालावधीमध्ये तक्रारीचे निरासन करण्याकरिता त्याची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy २०२२-२३ ची ठळक वैशिष्ट्ये**

**(योजनेचा कालावधी दि.१५.०५.२०२२ ते दि. १४.०५.२०२३)**

१. MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy **चा क्रमांक १६३६००/४८/२०२३/८५२** असा असून या योजनेचा कालावधी दि.१५.०५.२०२२ च्या मध्यरात्रीपासून म्हणजेच दि.१४.०५.२०२२ (००:०० तासापासून) ते दि.१४.०५.२०२३ च्या मध्यरात्रीपर्यंत (२४:०० तासांपर्यंत) असा एक वर्षाचा आहे.

२. सदर योजना **म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्या. व महावितरण कंपनीमध्ये माहे मे - २०२२ रोजी** सेवेमध्ये **कार्यरत** असणाऱ्या **सर्व कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित** असणाऱ्या **कुटुंबातील ०५ सदस्यांसाठी लागू राहील.** तसेच, सर्व संचालक, प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी आणि महावितरण कंपनीमधील **पदवी प्रशिक्षण अभियांत्रिकी (GTE) व पदविका प्रशिक्षण अभियांत्रिकी (DTE)** तसेच लेखा सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) / (मासं), उपकेंद्र सहाय्यक, विद्युत सहाय्यक व वीजसेवक अशा विहीत पध्दतीने नियुक्त झालेल्या सर्वांना लागू राहील.

३. सदर योजनेतंर्गत **रु.०५ लाखांपर्यत** कमाल वैद्यकीय विमा संरक्षण हे कर्मचारी व त्याच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील खाली नमूद कुटुंबाच्या व्याख्येतील वर्गवारीपैकी कर्मचाऱ्याने निर्देशीत केलेल्या कोणत्याही ०५ सदस्यांसाठी आहे.

**कुटुंबाची व्याख्या :-**

- **कर्मचारी / अधिकारी यांची पत्नी किंवा पती.**
- **कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबित असणारी औरस मुले/ सावत्र मुले / कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.**
  **(तथापि, विमा कंपनीच्या नियमानुसार अवलंबित मुलांच्या बाबतीत खालील अटी लागू राहतील.)**
  - **१८ वर्षांपेक्षा जास्त वय असलेला मुलगा / मुलगी नोकरी करत असल्यास अथवा मुलगी विवाहीत असल्यास त्यांना अवलंबित समजण्यात येणार नाही.**

- तथापि, २६ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलाचे शिक्षण सुरु असेल व तो कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित असेल तर अशा मुलाला अवलंबित समजण्यात येईल.
- मुलगी अविवाहीत असल्यास तिचा विवाह होईपर्यंत ती कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबित आहे असे समजण्यात येईल.
- कर्मचाऱ्यांवर संपूर्णपणे अवलंबून असलेली मतीमंद अथवा अपंग मुले.

➢ कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले कर्मचारी / अधिकारी यांचे आई-वडील, महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्यावर पूर्णपणे अवलंबून आणि त्यांच्याबरोबर राहत असलेल्या त्यांच्या आई-वडीलांची किंवा सासु-सासऱ्यांपैकी एकाचीच निवड करता येईल.

➢ कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या १८ वर्ष वयाखालील अविवाहीत भाऊ.

➢ कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत अथवा विधवा बहिणी, यांच्याबाबत त्यांचे वय लक्षात घेऊ नये.

➢ या नियमाखालील प्रतिपूर्ती करण्यासाठी, कर्मचारी / अधिकारी यांची अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली मुले आणि अविवाहीत मुली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. कर्मचारी / अधिकारी यांच्यावर अवलंबून असलेल्या आईवडीलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मुळ निवृत्ती वेतन रु.५०००/- पर्यंत आहे असे आईवडील तसेच घटस्फोटीत / विधवा बहीण हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

४. मेडीक्लेम योजना सन २०२२-२३ या कालावधीमध्ये जन्मजात मुलास ३० दिवसांऐवजी पहिल्या दिवसापासून (Baby day one cover) अशी सुधारणा करण्यात आलेली आहे.

५. मेडीक्लेम योजना सन २०२२-२३ करिता म.रा.वि.मं.सुत्रधारी कं.मर्या. व महावितरण या कंपन्यांमधील सर्व कर्मचाऱ्यांच्या (सर्व सहाय्यक कर्मचाऱ्यांसह) वेतनातून माहे जून -२०२२ पासून ते मे-२०२३ पर्यंत दरमहा रु.७२८/- (GST सह) याप्रमाणे विमा हप्त्याची रक्कम कपात करण्यात यावी. तसेच, मेडीक्लेम योजना सन २०२२-२३ या कालावधीत नव्याने रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून देखील सदर विमा हप्ता रक्कम कपात करण्यात यावी.

टिप : १. जे कर्मचारी माहे मे - २०२२ मध्ये सेवानिवृत्त झाले अथवा मयत झाले आहेत अशा कर्मचाऱ्यांना / त्याच्या अवलंबितांना (वारसांना) या आरोग्य विमा योजनेचा लाभ दि.१४.०५.२०२३ पर्यंत मिळणार असल्याने अशा कर्मचाऱ्यांकडून Money Receipt द्वारे संबंधीत लेखा विभागाकडे ERP-10902351 या खाते शिर्षकाखाली (Account Head) विमा हप्ता रक्कम एकरकमी दरमहा रु.७२८/- प्रमाणे वार्षिक रु.८७३६/- (GST सह) तसेच मागील मेडीक्लेम योजनेचा विमा हप्ता रु.७००/- असे जमा करुन घेण्यात यावे.

२. जे कर्मचारी माहे जून - २०२२ ते मे - २०२३ या कालावधीत सेवानिवृत्त अथवा मयत झाले असल्यास अशा कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वार्षिक विमा हप्ता रक्कमेपैकी दरमहा कपात करण्यात आलेली विमा हप्ता रक्कम वगळता उर्वरित रक्कम कर्मचाऱ्यांच्या शेवटच्या वेतनातून कपात करण्यात यावी.

३. वर नमूद केल्यानुसार मेडीक्लेम योजनेसाठी कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकपणे अदा करण्यात येणारी विमा हप्ता रक्कम आयकर कायद्याच्या कलम -८० (ड) नुसार सवलतीसाठी पात्र राहील.

६. सदर योजनेतंर्गत Cashless Or Non - Cashless वैद्यकीय उपचार घेण्यासाठी रुग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर उपचारासाठी देण्यात येणाऱ्या कक्षाचे दर खालीलप्रमाणे राहतील.

- सामान्य कक्ष (General Room) : Room Rent limited to 0.8% of Sum Insured (Rs. 4000/-) or actual expenses whichever is less.
- अति दक्षता विभागातील कक्ष (ICU Room) : Room Rent limited to 1.60% of Sum Insured (Rs. 8000/-) or actual expenses whichever is less.

७. म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या व महावितरण कंपन्यांतील कर्मचाऱ्यांची सदर योजनेच्या कालावधीमध्ये सेवा समाप्ती (Termination) झाल्यास किंवा कर्मचाऱ्याचा राजीनामा स्विकारल्यास अशा कर्मचाऱ्यास व त्याच्या अवलंबितास या योजनेचा लाभ उर्वरित कालावधीसाठी मिळणार नसल्याने याबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भातील दक्षता संबंधीत विभागाने घ्यावी.

सबब, ज्या - ज्या सक्षम अधिकाऱ्यांमार्फत सेवा समाप्ती किंवा राजीनामा प्रकरणी आदेश निर्गमित करण्यात येतील अशा प्रकरणांची माहिती संबंधीत परिमंडळ कार्यालयांच्या मानव संसाधन विभाग प्रमुखाने (सांघिक कार्यालयाकरिता प्रकरण परत्वे मुख्य महाव्यवस्थापक (मासं) / (तांत्रिक आस्था) / (वित्त व लेखा) यांच्या विभागांमार्फत) दरमहा तातडीने मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना ईमेलद्वारे irdho123@gmail.com यावर पाठवावी. वर नमूद केल्यानुसार संबंधीत कर्मचाऱ्यांची माहिती (निरंक असेल तरीही) दरमहा न कळविल्यास सदर बाबत जबाबदारी निश्चित करण्यात येवून यानुषंगाने, कंपनीवर येणाऱ्या आर्थिक भाराची वसूली संबंधीत प्रकरणी जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

८. **महावितरण कंपनीतील सर्व सहाय्यक प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर रु.७२८/- इतकी रक्कम आरोग्य विमा अनुदान म्हणून माहे जून - २०२२ पासून ते माहे मे - २०२३ या कालावधीकरिता वेतनातून अदा करण्यात यावी.**

९. वर नमूद केल्यानुसार विमा हप्त्याची दरमहा अथवा एकरकमी कपात केलेली रक्कम महावितरण कंपनीच्या मुख्य महाव्यवस्थापक (सां.ले.) यांच्या निर्देशानुसार **ERP-10902351** या खाते शिर्षकाखाली (Account Head) जमा करण्यात यावी.

१०. **या योजनेमध्ये आजारांवरील खर्चाची मर्यादा (Diseasewise Capping) काढण्यात आलेली आहे. परंतु, डोळयाच्या शस्त्रक्रियेसाठी प्रति डोळा रु. २४०००/- ची मर्यादा आहे.** तसेच, या योजनेमध्ये कर्मचाऱ्यास किंवा त्यांच्या अवलंबितास पूर्वी असलेल्या आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे. (Pre-existing Diseases Covered)

११. या योजनेमध्ये पहिल्या ३० दिवसांपर्यंतचा आणि योजना सुरु झाल्यापासून पहिल्या ०२ ते ०४ वर्षापर्यंतचा प्रतिक्षा कालावधी शिथिल / माफ करण्यात आलेला आहे. (1st 30 days & upto 02 to 04 years waiting period waived off )

१२. या योजनेंतर्गत रुग्णालयामध्ये दाखल होण्यापूर्वी ३० दिवसांपूर्वीचा व रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतरचा ६० दिवसांपर्यंत केलेल्या उपचारासाठीच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देय आहे. (Pre hospitalisation upto 30 days and post hospitalisation upto 60 days Covered)

१३. कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांना Medi Assist (TPA) कंपनीच्या नेटवर्क रुग्णालयामध्ये (महावितरण कंपनीच्या Employee Portal (http://empportal.mahadiscom.in/EmpPortal) अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली List of Hospitals यामध्ये नेट वर्क रुग्णालयांची यादी पहावयास मिळेल) वैद्यकीय उपचारासाठी कॅशलेस सेवेचा लाभ मिळेल. तसेच विना नेटवर्क रुग्णालयामध्ये उपचार घेतल्यास सदर योजनेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वैद्यकीय उपचाराची अनुज्ञेय प्रतिपूर्ती दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि., पुणे या विमा कंपनीकडून Medi Assist (TPA) कंपनीच्या मार्फत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात अदा केली जाईल.

**<u>टिप :</u>** कर्मचाऱ्यांने विना नेटवर्क रुग्णालयामध्ये उपचार घेतल्यास सदर योजनेच्या अटी व शर्तीनुसार रुग्णालयातून डिस्चार्ज झालेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत प्रस्ताव Medi Assist (TPA) कंपनीकडे प्रतिपूर्तीसाठी सादर करणे बंधनकारक आहे.

१४. **<u>अवलंबित सदस्यांची व इतर माहिती अद्ययावत करणेबाबत :-</u>**

सदर योजनेसाठी दि.१५.०५.२०२२ रोजी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना दि.१५.०५.२०२२ ते दि.१४.०५.२०२३ या कालावधीकरिता कुटुंबातील नवीन अवलंबित सदस्यांच्या नावाचा समावेश अथवा नोंदणीकृत सदस्यांपैकी एखाद्या सदस्यांची नोंदणी कायमस्वरुपी काढून टाकणे इ. करिता महावितरण Employee Portal अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली Mediclaim enrollment / E-card या link वर गेल्यास आपण **MediBuddy.in** या **Medi Assist Insurance TPA Pvt.Ltd** यांच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून आपणास खालील माहिती अद्यावत करण्याचे पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

**मेडिक्लेमचा लाभ घेण्यासाठी लागणारे विविध पर्याय :**

- View your policy details (आपल्या पॉलीसी संबंधीची संपूर्ण माहिती)
- Addition & Delection of family members (कुटुंबातील नवीन सदस्यांच्या नावांचा समावेश किंवा वगळणे ) ***(सदर प्रक्रिया ही परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखेपासून ३० दिवसांपर्यंतच खुले राहील. तद्नंतर कोणताही बदल करता येणार नाही यांची दक्षता घेण्यात यावी)***
- Get eCashless for provisional pre authorization (ई-कॅशलेस-पुर्व मंजुर कॅशलेस)
- Track Claim in real-time (जमा केलेल्या क्लेमची सद्यस्थिती (प्रगती))
- Submit Claim online (ऑनलाईन जमा करण्याची सुविधा)
- Enrollment and Download your e-cards (ई-कार्ड मिळवण्याची सुविधा)

- Get help and whenever you need it (गरजेच्या वेळेस मदत)
- Search Hospital (मान्यता प्राप्त सर्व रुग्णालयाची यादी)

तसेच दि.१५.०५.२०२२ ते दि.१४.०५.२०२३ या कालावधीकरिता कुटुंबातील नवीन अवलंबित सदस्यांच्या नावाचा समावेश अथवा नोंदणीकृत सदस्यांपैकी एखाद्या सदस्यांची नोंदणी कायमस्वरुपी काढून टाकणे किंवा तसेच ठेवणे याकरीता आपणांस Enrollment या शिर्षकाखाली दि.३०.०६.२०२२ पर्यंत Submit करुन Confirm केल्यानंतर कर्मचाऱ्याला योजनेच्या कालावधीमध्ये कुठल्याही सदस्याचा नव्याने समावेश करता येणार नाही. (याबाबत सर्व कर्मचाऱ्यांनी आपले व परिवारातील सदस्यांच्या नावाबाबत खात्री करुन घ्यावी दि.३०.०६.२०२२ नंतर याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.)

**मात्र,** नवविवाहीत सदस्याच्या बाबतीत (लग्न झालेल्या तारखेपासून) व नवजात बालकाच्या बाबतीत (जन्म झालेल्या पहिल्या दिवसापासून) सदस्यांची माहिती कर्मचाऱ्यांना त्या-त्या वेळेस भरता येईल. याकरिता, कर्मचाऱ्यांनी संबंधीत सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित केलेली सदस्यांच्या नावांची Excel sheet संबंधीत परिमंडळाच्या उपमुख्य औद्योगिक सबंध अधिकारी यांना ईमेलद्वारे पाठवावी. उपमुख्य औद्योगिक सबंध अधिकारी यांनी सदर अवलंबितांची माहिती msebmediclaim@mediassist.in यावर ईमेल करुन कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांची नोंद झाल्याची खात्री करावी. (सोबत Excel sheet जोडलेली आहे.)

## १५. सामान्य आदेश क्र. २० (क) च्या तरतूदी - (फक्त कर्मचाऱ्यांबाबत)

**१५.१ वैद्यकीय सुविधा -** कंपन्यांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता सर्वसाधारण आदेश क्र. २०(क), दि. १७/०७/१९६३ मधील तरतुदीनुसार देण्यात येणारा लाभ पूर्वीप्रमाणेच चालू राहील, त्यात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. मात्र कर्मचाऱ्यांस रु.०५ लाखांपर्यंत वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा लाभ सुरुवातीस MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy द्वारेच घ्यावा लागेल. कर्मचाऱ्यांकरीता स्वत:साठी रु.०५ लाखांपेक्षा जास्त झालेल्या प्रत्यक्ष वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी सामान्य आदेश क्र.२० (क) प्रमाणे लाभ देय राहील.

**१५.२ वैद्यकीय अग्रीम -**

**अ) कर्मचाऱ्यांना कामावर असताना अपघात झाल्यास** अथवा तातडीच्या प्रसंगी ज्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले ते रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी Medi Assist कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये नसेल तर परिमंडल कार्यालयांकरिता उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी व अन्य कार्यालयांच्या बाबतीत संबंधीत विभागातील मानव संसाधन विभाग प्रमुखांने कर्मचाऱ्याच्या सदर प्रकरणाची माहिती Medi Assist (TPA) कंपनीस दूरध्वनीद्वारे **(MSEB Mediclaim Help Line No. ०४०-६८१७२७२७ )** देवून २४ तासांच्या आत प्राथमिक दावा / सुचनांच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे नाव, भ.नि.नि. क्रमांक, रुग्णाचे नाव, रुग्णालयाचे नावं व पत्ता इ. माहितीचा ईमेल देखील msebmediclaim@mediassist.in यावर पाठवावा.

**ब)** त्यानंतर, सा.आ.क्र.२०(क) दि.१७.६.१९६३ नुसार प्रशासकीय परिपत्रक क्र.६११ दि. १४.१०.२०२० मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकारी यांनी प्रकरण परत्वे कर्मचाऱ्यास वैद्यकीय उपचारासाठी अग्रीम रक्कम मंजूर करावी.

**क)** कर्मचाऱ्यास वरील प्रकरणी वैद्यकीय अग्रीम महावितरण कंपनीकडून मंजूर करण्यात आला असल्याची सुचना Medi Assist (TPA) कंपनीस ईमेलद्वारे msebmediclaim@mediassist.in द्यावी.

**ड)** अप्राणांतिक अपघाताच्या अथवा इतर तातडीच्या आजारांच्या घटनेमध्ये प्रकरणपरत्वे रुग्णालयास कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारासाठी कंपनीकडून अग्रीम रक्कम दिलेली असल्यास कर्मचाऱ्याने रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर तातडीने वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रस्ताव संबंधीत कार्यालयाकडे सादर करावा. संबंधीत कार्यालयाने सदर प्रस्तावासोबत वैद्यकीय अग्रीम म्हणून रुग्णालयास अदा केलेल्या रक्कमेच्या पावतीची छायांकित प्रत व संबंधीत कार्यालयाचा बँक खाते क्रमांकासह IFSC Code ची माहिती देवून सदर प्रकरणी मंजूर होणारी रक्कम कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठीचे

स्वतंत्र पत्र जोडून प्रस्ताव कार्यालय प्रमुखामार्फत Medi Assist (TPA) कंपनीकडे पाठवावा. Medi Assist कंपनीकडून या प्रकरणी मंजूर रक्कम संबंधीत कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा होईल, त्यानंतरच संबंधीत कार्यालयाने अग्रीम / वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा. सदर रक्कमेच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत संबंधीत कार्यालयाच्या मानव संसाधन विभाग प्रमुखाने Medi Assist कडे पाठपुरावा करावा या प्रकरणी संबंधीत परिमंडळांतील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे.

इ) प्राणांतिक अपघाताच्या घटनेमध्ये अथवा वैद्यकीय उपचाराप्रसंगी दुर्दैवाने मृत्यु झाल्यास अग्रीम रक्कम मंजूर करुन रुग्णालयास सदर रक्कमेचा धनादेश अदा केला असल्यास अशा प्रकरणी वैद्यकीय अग्रीम / वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण होईपर्यंत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास तितक्या रक्कमेची देयके अदा करण्यात येवू नये.

**१५.३ वैद्यकीय प्रतिपूर्ती -:**

- कर्मचारी / कुटुंबीयाने Medi Assist कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये उपचार घेतले नसतील व सदर रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी नसेल तर कर्मचारी / कुटुंबातील सदस्यांने Medi Assist (TPA) कंपनीकडे **MSEB Mediclaim Help Line No. 040-68172727** यावर दुरध्वनीद्वारे अथवा ईमेलद्वारे २४ तासांच्या आत प्राथमिक दाव्याबाबत १५.२ च्या 'अ' मध्ये नमूद केल्यानुसार सुचना द्यावी. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर तातडीने झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव Medi Assist कंपनीकडे प्रतिपूर्ती दावा कार्यपध्दतीमध्ये नमूद केल्यानुसार (MDIndia कंपनीच्या संकेतस्थळावर नमूद केल्यानुसार) योग्य ती सर्व कागदपत्रे जोडून संबंधीत कार्यालय व समन्वय अधिकारी (Nodal Officer) यांचेमार्फत पाठविणे बंधनकारक आहे.
- सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर Medi Assist (TPA) कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने रु. ०५ लाख मर्यादेपर्यंत वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कम मंजूर केली जाईल. सदर रक्कम कर्मचाऱ्याने अथवा अवलंबितांने प्रस्तावासोबत दिलेल्या **IFSC Code** नुसार बँकेच्या खात्यावर Medi Assist (TPA) कंपनीकडून परस्पर वर्ग करण्यात येईल.
- कार्यरत कर्मचाऱ्यास कामावर असताना अपघात झाल्याप्रकरणी अथवा तातडीच्या प्रसंगी कर्मचाऱ्यास वैद्यकीय अग्रीम अदा केला असल्यास १५.२ च्या 'ड' व 'इ' मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.
- उपरोक्त प्रकरणी वैद्यकीय उपचारासाठी **फक्त कर्मचाऱ्यांसंदर्भात** प्रत्यक्षात झालेल्या एकूण खर्चाची रक्कम ही रु. ०५ लाख यापेक्षा जास्त असल्यास सदर प्रकरणी स.स्था.आ.क्र.३७७, दि.३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२, दि.१२.०२.१९९८ व सा.आ.क्र.२० (क) दि.१७.६.१९६३ तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.२७२ दि.३०.१२.२००९ मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकाऱ्यांनी वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करुन वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा.

१६. कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारापोटी या योजनेतंर्गत उपलब्ध असलेली विमा रक्कम रु.०५ लाख कंपनीच्या कार्यरत कर्मचाऱ्यासाठी खर्च झालेली असल्यास व तद्नंतर कर्मचाऱ्यांवर अवलंबित असणाऱ्या ०५ सदस्यीय कुटुंबियांपैकी कुठल्याही व्यक्तीस उपचाराची आवश्यकता असल्यास अशा प्रकरणी कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांकरिता रु.०५ लाखापर्यंतच्या वैद्यकीय विम्याचा लाभ एक विशेष बाब म्हणून उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

याकरिता, संबंधीत कार्यालयाने परिमंडळांच्या मुख्य अभियंता यांच्यामार्फत त्याबाबतचा प्रस्ताव मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सांघिक कार्यालय, मुंबई यांचेकडे पाठवावा. सदर प्रस्तावास संचालक (वित्त) हे संचालक (मासं) व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन मंजूरी देण्यासाठीचे सक्षम अधिकारी राहतील.

**१७. Additional Top Up Premium वेतनातून कपात करण्याची संमती देणेबाबत :-**

ज्या कर्मचाऱ्यांना मुळ राशीभूत विमा रक्कम रु.०५ लाखांच्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेचा म्हणजेच, रु.०५ लाख पुढील रक्कमेचा अतिरिक्त विमा (Additional Top Up) घ्यावयाचा असल्यास कर्मचाऱ्यांना विमा रक्कम रु.०१ लाख ते रु.१० लाख यापैकी एका विकल्पाची निवड करावयाची आहे.

याकरिता कर्मचाऱ्यांनी महावितरणच्या **Employee Portal** अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली Application for Additional Top Up अंतर्गत Apply Top Up या पर्यायानुसार रु.०५ लाखांपुढील रक्कमेचा अतिरिक्त विमा (Additional Top Up) करिता रु.०१ लाख ते रु.१० लाख यापैकी एका विकल्पाची निवड दि.१९.०६.२०२२ पर्यंत करावयाची आहे. सदर विकल्पाची निवड केल्यानंतर Submit करुन Confirm करावयाचे आहे. कर्मचाऱ्यांनी ज्या Additional Top Up विकल्पाची निवड केली असेल त्याकरिता येणारी वार्षिक विमा हप्त्याची रक्कम GST सह एकरकमी कर्मचाऱ्यांच्या माहे जून-२०२२ च्या वेतनातून कपात करण्यात येईल.

वर नमुद केल्यानुसार कर्मचाऱ्यांच्या माहे जून-२०२२ च्या वेतनातून कपात केलेली रक्कम **विमा कंपनीस अदा केलेल्या तारखेपासून Top Up योजनेचा लाभ कर्मचारी व त्याच्या परिवारास घेता येईल व एकदा कपात झालेली रक्कम कर्मचाऱ्याला परत मिळणार नाही वेतनातून कपात झालेली रक्कम विमा कंपनीस दि.१५.०७.२०२२ पर्यंत अदा होईल तद्नंतरच Top Up योजनेचा लाभ मिळेल ही बाब कर्मचाऱ्यांनी Option भरताना लक्षात घ्यावी. Employee Portal मार्फत Top Up योजनेचे विकल्पाचे निवड करण्याकरिताचे लिंक दि.१.६.२०२२ ते दि.१९.०६.२०२२ पर्यंत खुली राहणार आहे.** (सदर कालावधीनंतर कुठल्याही परिस्थितीत सदर विकल्पाची निवड करण्याची सुविधा उपलब्ध होणार नाही.)

जर कर्मचाऱ्याला इच्छिुक Additional Top Up घ्यावयाची असल्यास व मासिक वेतनातून एकरकमी विमा रक्कम कपात होवू शकत नसल्यास अशा कर्मचाऱ्यांने संबंधीत लेखा विभागाकडे Money Receipt द्वारे **ERP-10902351** या खाते शिर्षकाखाली (Account Head) जमा करण्यात यावी, व भरणा केलेली पावती मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना ईमेलद्वारे irdho123@gmail.com यावर पाठवावी. दि.३०.०६.२०२२ पर्यंत प्राप्त होणाऱ्या Money Reciept चाच विचार करण्यात येईल त्यामुळे दि.०१.०७.२०२२ नंतर Top Up करीता रोख स्वरुपात रक्कम स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**Additional Value Top Up विकल्प रु. ०१ लाख ते रु. १० लाख करिता अतिरिक्त वार्षिक विमा हप्ता.**

| रु. ०५ लाखांपुढील अतिरिक्त विमा (Top Up) | संपूर्ण वर्षाकरिता विमा हप्ता (GST सह) रुपयांमध्ये | रु. ०५ लाखांपुढील अतिरिक्त विमा (Top Up) | संपूर्ण वर्षाकरिता विमा हप्ता (GST सह) रुपयांमध्ये |
|---|---|---|---|
| १ लाख | ५७५३ | ६ लाख | २५९६० |
| २ लाख | ११२१० | ७ लाख | २७१४० |
| ३ लाख | १२३९० | ८ लाख | २७३७६ |
| ४ लाख | १५३४० | ९ लाख | २९१४६ |
| ५ लाख | १८८८० | १० लाख | ३३२७६ |

**टिप** :-उपरोक्तप्रमाणे इच्छिुक Top Up योजनेचा लाभ घेणाऱ्या **कर्मचाऱ्यांची संख्या ५०००-९९९९** व **१०००० ते १४९९९ तसेच १५००० पुढील** अशा एकूण कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्यास वरील दर्शविलेल्या विमा हप्त्यामध्ये एकूण कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार विमा हप्त्यामध्ये सुट देण्यात आलेली आहे. विमा कंपनीस रक्कम अदा करताना कर्मचारी संख्येनुसार Top Up सवलतीची रक्कम अदा करण्यात येऊन सुट मिळाल्यास सदर सवलतीची रक्कम माहे जुलै-२०२२ च्या वेतनातून कर्मचाऱ्यांना परत करण्यात येईल.

जर उपरोक्तप्रमाणे इच्छिुक Top Up करणाऱ्या एकूण कर्मचाऱ्यांची संख्या ४९९९ पुढील असल्यास त्यांना खालील दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या संख्येनुसार Top Up रु. १ ते १० लाखांकरिता येणाऱ्या विमा हप्त्यांच्या रक्कमेमध्ये सुट मिळेल.

| रु. ०५ लाखांपुढील अतिरिक्त विमा (Top Up) | कर्मचाऱ्यांची एकूण संख्या (गट) व विमा हप्ता रक्कम (GST सह) | | |
|---|---|---|---|
| | ५०००-९९९९ | १००००-१४९९९ | १५००० पुढील |
| १ लाख | ४६०२ | ४०२७ | ३७३९ |
| २ लाख | ८९६८ | ७८४७ | ७२८७ |
| ३ लाख | ९९१२ | ८६७३ | ८०५४ |
| ४ लाख | १२२७२ | १०७३८ | ९९७१ |
| ५ लाख | १५१०४ | १३२१६ | १०३८४ |
| ६ लाख | २०७६८ | १८१७२ | १४२७८ |
| ७ लाख | २१७१२ | १८९९८ | १४९२७ |
| ८ लाख | २१९०१ | १९१६३ | १५०५७ |
| ९ लाख | २३३१७ | २०४०२ | १६०३० |
| १० लाख | २६६२१ | २३२९३ | १८३०२ |

**टिप** :-जर १०० टक्के कर्मचाऱ्यांने रु. ५ लाखांकरिता इच्छिुक Top Up या लाभ घ्यावयाचा झाल्यास रु.५ लाखांकरिता रु.९०६८/- GST सह विमा रक्कन राहील.

१८. कर्मचारी व कुटुंबियांच्या सुविधेकरिता दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे व Medi Assist (TPA) यांचे मार्फत सर्व परिमंडल कार्यालयात Medi Assist (TPA) कंपनीचा प्रतिनिधी व Marsh India Insurance Broker Pvt. Ltd. (Nodal Officer) म्हणून उपस्थित असतील. कर्मचाऱ्यांनी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy संदर्भातील अडचणी सोडविण्याकरिता या नोडल अधिकाऱ्यांची मदत घ्यावी.

**Marsh India Insurance Broker Pvt Ltd यांचे कार्य :**

१. कर्मचाऱ्याला विमा योजनेबद्दल संपूर्ण माहिती व त्यासंदर्भात येणाऱ्या अडचणी सोडविणे.
२. विमा दावे मंजूरीसाठी विलंब झाल्यास किंवा मंजूर विमा दाव्याच्या रक्कमेत तफावत असल्यास त्याबाबत योजनेच्या अटी व शर्तीनुसार विमा कंपनी व TPA यांच्याशी चर्चा करुन समस्यांचे निरसन करण्यात येईल.
३. कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील अवलंबितांची नांवे योजनेमधील दर्शविलेल्या कुटूंबाच्या व्याख्येनुसार अद्यावत करणे.
४. विमा कंपनीने कर्मचाऱ्यांचे विमा दावे नाकारल्यास त्याबाबत विमा कंपनी व Medi Assist (TPA) यांच्याकडून योजनेच्या अटी व शर्तीनुसार कार्यवाही करणे.

**उपरोक्त प्रमाणे जर कर्मचाऱ्यांला Enrollment करते वेळी किंवा विमा दाव्यांसंदर्भात काही अडचणी / तक्रार असल्यास** Marsh India Insurance Broker Pvt Ltd. **यांच्या खालील दिलेल्या माहितीवर संपर्क साधावा.**

- **ईमेल आय डी - mseb.insurance@marsh.com**
- **श्री. संजीव चव्हाण - ८९७६८३५५०७**
- **श्री. साद तांबे - ९६१९५६३२१३**

कर्मचाऱ्यांना **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** संदर्भात स्पष्टीकरण, माहिती किंवा रुग्णालयात दाखल होण्यासाठी अथवा वैद्यकीय प्रतिपूर्तीचा दावा दाखल करण्यासाठी करावयाच्या प्रक्रियेकरिता मदतीची अथवा चौकशीची गरज असल्यास कर्मचारी अथवा त्याचे कुटुंबिय Medi Assist **(T.P.A.)** कंपनीच्या **बहुभाषीक ग्राहक सेवा केंद्राशी खाली नमूद केल्यानुसार संपर्क / संवाद करु शकतात.**

**Medi Assist (T.P.A.)**

- **सर्व साधारण चौकशी व कॅशलेस सुविधेच्या सवलतीसाठी हेल्पलाईन क्र. 040-68172727**
- **रुग्णालयात दाखल झाल्याची सूचना देण्यासाठी ईमेल -** msebmediclaim@mediassist.in

**Medi Assist कंपनीसोबत पत्रव्यवहार व वैद्यकीय प्रतिपूर्तीचे दावे दाखल करण्यासाठीचा पत्ता**

**Medi Assist Insurance TPA Pvt.Ltd**
**माणिकचंद आयकॉन सी विंग, पहिला मजला,**
**ढोले पाटील रोड, पुणे- ४११००१.**

सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या **Employee Portal** अंतर्गत **Mediclaim** व **Circular - Industrial Relation Department** येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

(अरविंद भादिकर)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या., मुंबई.
२. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.
३.संचालक (वित्त) / (सुरक्षा व अंमलबजावणी), म.रा.वि.मं.सुत्रधारी कं.मर्या., सां.का., मुंबई.
४.संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प) / (वाणिज्य) / महावितरण, सां.का., मुंबई.

**प्रत सस्नेह :**
सर्व कार्यकारी संचालक व विभाग प्रमुख.